व्यापार-उद्योग-कृषी-शिक्षण क्षेत्राच्या
विकासासाठी कटीबध्द - कोल्हापूर

Western Maharashtra Chamber of Commerce Industries, Agro & Education
WESMACH
Wings For Nation !

संपादक : ललित गांधी

# चेंबर पत्रिका

• मुंबई • पुणे • नाशिक • नगर • सातारा • सांगली • सोलापूर • रायगड • रत्नागिरी • सिंधुदुर्ग • कोल्हापूर

वर्ष : ८ ▸ अंक : ०८ ▸ नोव्हेंबर २०१७ ▸ पाने : १२ ▸ मुल्य १०/- ▸ वार्षिक मुल्य १०० रुपये




इंडिया बिझनेस रिफॉर्मस् परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी, उद्योगमंत्री सुरेश प्रभु, जागतिक बँकेच्या सीईओ जॉर्जीएव्हा, कॅबिनेट सचिव पी. के. सिन्हा, प्रमुख सचिव नृपेंद्र मिश्रा, डीआयपीपीचे सचिव रमेश अभिषेक



संरक्षणमंत्री सुभाष भामरे यांना 'चेंबर पत्रिके'चा अंक भेट देताना ललित गांधी

## 'व्यवसाय सुलभता'
## Ease of Doing Business
## भारताची १०० व्या स्थानावर गरूडझेप

Ease of Doing Business
for higher productivity and sustainable growth

◆ जीएसटीचा दिलासा ◆

## दैनंदिन वापरातील १७८ वस्तूंवर आता १८% कर

## निर्यातीवर भरलेल्या रक्कमेचा परतावा मिळणार

## MOODY'S
## १३ वर्षांनंतर सुधारले भारताचे जागतिक मानांकन



महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष व शताब्दी समारोह समितीचे चेअरमन ललित गांधी यांनी भारत सरकारचे परीवहन, शिपींग मंत्री नितीन गडकरी यांना ९० वर्षपुर्ती समारोहाचे निमंत्रण दिले. मंत्रीमहोदयांनी ते आनंदाने स्विकारले.



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांना महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष व शताब्दी समारोह समितीचे चेअरमन ललित गांधी यांनी ९० वर्षपुर्ती समारोहाचे निमंत्रण दिले. मुख्यमंत्र्यांनी समारंभास उपस्थित राहण्याचे आश्वासन दिले. यावेळी चेंबरचे संचालक जयेश ओसवालही उपस्थित होते.




महाराष्ट्र चेंबर तर्फे जीएसटी मधील अडचणींबाबत अर्थमंत्री नाम. सुधीर मुनगंटीवार व अर्थराज्यमंत्री नाम. दिपक केसरकर यांना निवेदन देताना अध्यक्ष संतोष मंडलेचा, उपाध्यक्ष ललित गांधी, समीर दुधगांवकर, आशिष पेडणेकर व अन्य मान्यवर.



महाराष्ट्राचे पर्यटन मंत्री जयकुमार रावल यांना राज्य अधिवेशनाचे निमंत्रण देऊन सन्मान करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष संतोष मंडलेचा, उपाध्यक्ष ललित गांधी सोबत पूर्व अध्यक्ष आशिष पेडणेकर व उपाध्यक्ष समीर दुधगावकर.

## प्रभावी साधेपणा

सामाजिक कार्यकर्ते व महान भारतीय बाबा आमटेंचे सुपुत्र डॉ. प्रकाश आमटे यांची ललित गांधी यांनी भेट घेतली. आमटे परिवाराच्या दोन्ही पिढ्यांनी महाराष्ट्रातील विदर्भात 'आनंदवना'तील अविकासीत भागात आदिवासींसाठी आपले जीवन नि:स्वार्थपणे समर्पित केले आहे. अखिल भारतीय मारवाडी युवा मंचचे राष्ट्रीय अध्यक्ष असताना सामाजिक बांधिलकीतून 'आनंद सब के लिए' या कार्यक्रमातंर्गत आपण त्यांच्या काही क्रियाकलापांत सहभागी होण्याचा आनंद अनुभवला असे ललित गांधी यांनी डॉ. आमटेंना याप्रसंगी सांगितले.



संपादकीय

# जीएसटी सुलभीकरण सुरू आहे

## Ease of Doing Business छोट्या शहरापर्यंत यावे

जीएसटी कायद्याच्या अंमलबजावणीपासून छोट्यात छोट्या व्यापाऱ्यापासुन मोठ्यात मोठ्या उद्योगांना कोणत्या न कोणत्या तरी अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

यामध्ये जीएसटी दरातील तक्रारी, अंमलबजावणी पद्धतीच्या तक्रारी, कर नसलेल्या वस्तुंचा कर जाळ्यात समावेश या तक्रारी तर होत्याच, परंतु तंत्रज्ञानातील त्रुटींमुळे होणाऱ्या त्रासाच्या तक्रारी सर्वाधिक आहेत.


सरकारने, केंद्रीय अर्थमंत्र्यांनी, अर्थ मंत्रालयातील वरीष्ठ अधिकाऱ्यांनी आम्हाला दिलेल्या आश्वासनाप्रमाणे वेळोवेळी मांडलेल्या तक्रारी व सुचविलेल्या सुधारणांचा सरकारने प्रामाणिकपणे विचार केला असून, त्या अनुसार सुधारणाही केल्या आहेत.

सरकारची ही भूमिका निश्चितच स्वागतार्ह आहे. परंतु तंत्रज्ञानाच्या येणाऱ्या अडचणी अद्याप दुर न होणे ही बाब खेदजनक आहे. साऱ्या जगाला तंत्रज्ञ पुरविणाऱ्या भारतामध्ये सरकारची एवढी मोठी ऐतिहासिक करसुधारणा तंत्रज्ञानातील त्रुटींमुळे बदनाम होते ही बाब Ease of Doing Business च्या यशाला गालबोट लावणारीच आहे. 'व्यवसाय सुलभता' जी Ease of Doing Business या संकल्पनेच्या नावाने ओळखली जाते.

जागतिक मुल्यांकनात १३० व्या नामुष्कीजनक क्रमांकावर असलेला भारत ३० टप्प्यांनी मोठी आघाडी घेत आपली गुणवत्ता सुधारत १०० व्या स्थानावर पोहोचला आहे. सरकारच्या प्रगतशील धोरणांची ही पावती आहे आणि याबद्दल आमचे कणखर पंतप्रधान नरेंद्रजी मोदी अभिनंदनास पात्र आहेत.

मात्र ही प्रगती व ही सुलभता देशातील छोट्या छोट्या शहरापर्यंत लवकरात लवकर पोहोचली पाहिजे. सर्वोच्च स्थानावरून अतिशय चांगले निर्णय होतात, परंतु अंमलबजावणीच्या स्तरावर फार अडचणी जाणवतात. अंमलबजावणीतील शेवटच्या टप्प्यांपर्यंतच्या यंत्रणांची मानसिकता सुधारणे जरुरीचे आहे.

छोट्यात छोट्या गावापर्यंत यावेळी ही व्यवसाय सुलभता येईल त्यावेळी आम्ही हे स्थान पहिल्या ५० पर्यंत ही गाठू शकू १३० पासुन १०० पर्यंतची झेप मोठी व अभिनंदनीय असली तरीही अजुनही आम्ही १०० व्या स्थानापर्यंत खाली आहोत, ही बोचणी टोचणारी आहे. १०० पासुन १० पर्यंत पोहोचण्याच्या अपेक्षेसह शुभेच्छा!!



**ललित गांधी**, संपादक



महाराष्ट्रातील उद्योग विकासासाठी संरक्षण राज्यमंत्री ना. सुभाष भामरे यांना निवेदन देऊन चर्चा करताना ललित गांधी, संदीप भंडारी व राजरीषी शर्मा.

## संरक्षण सामग्री उत्पादनाची क्लस्टर्स महाराष्ट्रात उभारण्यास प्राधान्य देऊ - केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री श्री. सुभाष भामरे

**नवी दिल्ली** : १९२७ साली शेठ वालचंद हिराचंद यांनी स्थापन केलेल्या 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' या संस्थेचे हे ९० वे वर्ष असुन या निमित्त महाराष्ट्र चेंबर तर्फे वेगवेगळे उपक्रम वर्षभर आयोजित करण्यात येणार आहेत.

९० वर्षापूर्वी स्थापन झालेल्या 'महाराष्ट्र चेंबर'ने महाराष्ट्राच्या आर्थिक, औद्योगिक विकासाबरोबरच सामाजिक विकासात महत्वपूर्ण, योगदान दिले आहे. महाराष्ट्राच्या निर्मितिच्या चळवळीतही 'महाराष्ट्र चेंबर'ने महत्वपूर्ण योगदान दिले आहे. अनेक गौरवपूर्ण घटनांची परंपरा असलेल्या 'महाराष्ट्र चेंबर'ने ९० वर्ष मोठ्या प्रमाणावर साजरे करण्याचे ठरवुन या निमित्ताने महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रात नवीन गुंतवणुक येण्यासाठीचे प्रयत्न, राष्ट्रीय स्तरावरील परिषदांचे आयोजन यासारखे उपक्रम राबविले जाणार आहे.

९० वर्ष समारोह वर्षभर विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येणार असुन, त्याचे निमंत्रण देण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे उपाध्यक्ष व 'शताब्दी समारोह समितीचे' चेअरमन ललित गांधी यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री श्री. सुभाष भामरे यांची त्यांच्या साउथ ब्लॉक येथील कार्यालयामध्ये भेट घेतली.

या भेटीमध्ये 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' चे संरक्षण, उत्पादन आणि इतर कार्यक्रमांमध्ये खाजगी सहभागाबद्दल चर्चा करण्यात आली. यावेळी केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री श्री. सुभाष भामरे महोदयांचा सत्कार करण्यात आला, तसेच त्यांना 'चेंबर पत्रिका' या मासिकेचा अंक भेट करण्यात आला. केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री श्री. सुभाष भामरे यांनी संरक्षण सामग्री उत्पादनांची क्लस्टर्स महाराष्ट्रात उभारण्यात प्राधान्य देऊ असे सांगून 'महाराष्ट्र चेंबर' ला औद्योगिक विकासासाठी लागणारे सर्व सहकार्य देण्याचे, तसेच महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या ९० वर्ष समारोह समारंभास उपस्थित राहण्याचे आश्वासन देऊन सदर समारोहास शुभेच्छा दिल्या. भेटीवेळी महाराष्ट्र चेंबरच्या युथ विंग चे को-चेअरमन संदिप भंडारी, राजरीषी शर्मा आदि उपस्थित होते.

# ‘फिक्की’ ने संशोधन क्षेत्राकडे अधिक लक्ष पुरवावे - अमित शहा

**उद्योगजगतातील प्रमुखांशी विशेष संवाद**





**‘भाजप’चे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा यांचा सत्कार करताना पंकज पटेल, राशेस शहा व अन्य मान्यवर व दुसऱ्या फोटोमध्ये अमित शहा यांचे स्वागत करताना पंकज पटेल, राशेस शहा, ललित गांधी, जयेश ओसवाल आदी.**

**नवी दिल्ली** : भारताच्या औद्योगिक व आर्थिक विकासामध्ये गेल्या शंभर वर्षात ‘फिक्की’ ची भुमिका महत्वपुर्ण ठरली आहे, व्यापार–उद्योग जगताचे प्रतिनिधि म्हणुन सरकारबरोबर उत्तम संवाद साधणाऱ्या ‘फिक्की’ ने यापुढील काळात आधुनिक तंत्रज्ञानाची उत्पादने भारतात बनविण्यासाठी आवश्यक अशा संशोधनावर भर द्यावा अशी अपेक्षा भाजप चे राष्ट्रीय अध्यक्ष, खासदार अमित शहा यांनी व्यक्त केली.

‘फिक्की’ च्या राष्ट्रीय कार्यकारीणी सदस्यांबरोबर आयोजित ‘विशेष संवाद’ कार्यक्रमप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की जागतिक स्तरावर संशोधन व संशोधनाच्या बौध्दिक स्वामीत्वाचे हक्क या गोष्टींना विशेष महत्व आहे.

भारताचे तंत्रज्ञानासाठीची परदेशावर असलेले अवलंबित्व कमी करण्यासाठी सर्व तंत्रज्ञान देशात विकसित व्हावे त्यासाठी प्रमुख उद्योजकांच्या समुहाने एकत्रित येऊन संशोधनासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

प्रारंभी ‘फिक्की’ चे अध्यक्ष पंकज पटेल यांनी प्रास्ताविकात ‘फिक्की’ च्या ९० वर्षाच्या वाटचालीचा आढावा घेतला.

सभेपूर्वी पदाधिकाऱ्यांच्या झालेल्या चर्चेत ‘फिक्की’ चे एक्झिक्युटीव्ह कमिटी चे सदस्य ललित गांधी यांनी सहभाग घेतला.

सभेप्रसंगी फिक्की चे अध्यक्ष पंकज पटेल, वरीष्ठ उपाध्यक्ष राशेस शहा, फिक्की कार्यकारीणी सदस्य व महाराष्ट्र चेंबर चे उपाध्यक्ष ललित गांधी, महाराष्ट्र चेंबरचे संचालक जयेश ओसवाल आदींनी सभास्थळी अमित शहा यांचे स्वागत केले.

सभेला देशातील प्रमुख उद्योजक व संस्थांचे प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते. ◆◆

# जीएसटी अंमलबजावणीतील अडचणी प्राधान्याने दुर करू - अर्थमंत्री मुनगंटीवार

**मुंबई** : जीएसटी करप्रणालीतील प्रत्यक्ष अंमलबजावणी प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दुर करण्यास प्राधान्य दिले जाईल अशी ग्वाही राज्याचे अर्थमंत्री नाम. सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

जीएसटी लागु झाल्यानंतर राज्यभरातील व्यापारी–उद्योजकांना वेगवेगळ्या प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे व्यापार–उद्योगावर ही विपरीत परिणाम होत आहे. यासंबंधी चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या पदाधिकाऱ्यांशी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार व अर्थराज्यमंत्री नाम. दिपक केसरकर यांच्या समवेत मंत्रालयात संयुक्त बैठक संपन्न झाली त्याप्रसंगी ते बोलत होते. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष संतोष मंडलेचा, उपाध्यक्ष ललित गांधी, समीर दुधगांवकर, माजी अध्यक्ष आशिष पेडणेकर यांच्यासह विविध पदाधिकाऱ्यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत सहभाग घेऊन व्यापारी–उद्योजकांच्या जीएसटी विषयक अडचणी मांडल्या व यासंबंधीचे निवेदनही सादर केले.

तसेच महाराष्ट्र चेंबर तर्फे राज्यभरातील व्यापारी–उद्योजक यांची ‘राज्यस्तरीय जीएसटी परिषद’ आयोजित केल्याची माहिती देऊन अर्थमंत्र्यांना निमंत्रण दिले.

सदर परिषदेस अर्थमंत्री नाम. सुधीर मुनगंटीवार, अर्थराज्यमंत्री दिपक केसरकर व राज्याचे जीएसटी आयुक्त राजीव जलोटा यांनी उपस्थित राहण्याचे मान्य केले. तसेच सदर राज्यव्यापी परिषदेत मांडल्या जाणाऱ्या विषयांवर राज्य सरकारकडून तात्काळ कार्यवाही केली जाईल, तसेच जीएसटी काऊन्सील च्या अखत्यारीतील विषय राज्यातर्फे प्रभावीपणे मांडून ते विषयही मार्गी लावण्यात येतील अशी ग्वाहीही अर्थमंत्री नाम. सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. ◆◆

# कोल्हापूर जिल्ह्याच्या औद्योगिक व कृषी प्रक्रिया उद्योगांच्या विकासासाठी महाराष्ट्र चेंबर विशेष उपक्रम राबवेल - संतोष मंडलेचा

## शतकमहोत्सवी दशकानिमित्त नवीन सभासद श्रेणी घोषित



महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष संतोष मंडलेचा यांचा सत्कार करताना कोल्हापूर चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, सोबत जयेश ओसवाल, शिवाजीराव पोवार, चंद्रकांत जाधव, आनंद माने व हरीभाई पटेल.



पत्रकार परिषदेत माहिती देताना संतोष मंडलेचा सोबत ललित गांधी, आनंद माने व हरिभाई पटेल.

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्हा हा उद्यमशील लोकांचा जिल्हा असुन राजर्षि शाहुंच्या प्रोत्साहनाने इथल्या उद्योगाला बळ मिळाले आहे.

राज्याची व्यापार-उद्योग-सेवा व कृषि क्षेत्राची शिखर संस्था या नात्याने संपूर्ण राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र चेंबर गेली ९० वर्षे कार्यरत आहे.

चेंबरचे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद व छत्रपति राजाराम महाराज यांच्या विशेष संबंधामुळे १९४० साली कोल्हापूर-मुंबई विमानसेवा सुरू केली होती. या जिल्ह्याशी हे ऋणानुबंध चेंबरने कायमच जपण्याचा प्रयत्न केला असून, ९० वर्षे पुर्ण करून १०० व्या वर्षाकडे वाटचाल करताना येणारी १० वर्षे राज्याच्या विकासाचा वेग वाढविण्यासाठी, चेंबरने विविध नवीन उपक्रम राबविण्याचे निश्चित केले आहे.

त्याचाच एक भाग म्हणुन कृषि क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान, कृषी प्रक्रिया क्षेत्रातील उद्योगासाठीच्या नवीन संधी याविषयी विशेष परिषद फेब्रुवारी २०१८ मध्ये कोल्हापूर येथे आयोजित करण्यात येणार आहे.

तसेच कृषि उत्पन्न बाजार समितिशी निगडीत विविध तरतुदी, समस्या यांच्यावर तोडगा काढण्यासाठी बाजार समितिशी निगडीत घटकांची राज्यस्तरीय परिषद २० डिसेंबर २०१७ रोजी कोल्हापूर येथे आयोजित केली जाणार आहे.

महाराष्ट्राच्या उद्योग-व्यापार क्षेत्राला जागतिक बाजरपेठ मिळावी तसेच जागतिक गुंतवणुक महाराष्ट्रात यावी यासाठी एप्रिल २०१८ मध्ये 'महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्स्पो' आयोजित करण्यात येत आहे.

'जीएसटी' सारख्या कररचनेतील त्रुटी दुर करून व्यापारी-उद्योजक यांना सुटसुटीत रचना असावी यासाठी राज्यशासन व केंद्र शासनाशी अधिकृतपणे सातत्याने समन्वय ठेवला जात आहे.

याचबरोबर कोल्हापूरातील दुग्ध व्यवसायातील नवीन संधीसाठी नेदरलँड सरकारच्या सहाय्याने एक विशेष उपक्रम आयोजित करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

कोल्हापूरच्या पायाभुत सुविधांचा विकास व्हावा तसेच इंजिनिअरींग, कृषिपूरक, वस्त्रोद्योग या क्षेत्रांच्या विकासासाठी महाराष्ट्र चेंबर पुढाकार घेऊन कार्य करेल.

महाराष्ट्र चेंबरच्या शतकमहोत्सवी वाटचालीतील महत्वाचा टप्पा असलेल्या या दशकाच्या विशेष उपक्रमांसाठी 'शताब्दी समिती' गठीत केली असून, या समितिच्या चेअरमन पदाची जबाबदारी चेंबरचे उपाध्यक्ष व कोल्हापूर चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांना दिली आहे. त्यांच्या माध्यमातुन कोल्हापूरच्या विकासासाठी विशेष उपक्रम निश्चितपणे राबवु अशी ग्वाहीही महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष संतोष मंडलेचा यांनी दिली.

पत्रकार परिषदेस महाराष्ट्र चेंबर चे उपाध्यक्ष व कोल्हापूर चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, जयेश ओसवाल, बाबासो कोंडेकर, चंद्रकांत जाधव, राजु पाटील, सुरजीतसिंग पोवार, हरीश्चंद्र धोत्रे, लक्ष्मीदास पटेल, हरीभाई पटेल, आनंद माने, शिवाजीराव पोवार, राहुल नष्टे, विनोद डणुंग आदि मान्यवर उपस्थित होते.

# सीजीएसटी नियम २०१७ च्या नियम ९६ अंतर्गत वस्तुंच्या निर्यातीवर भरलेल्या रक्कमेचा परतावा बाबतचे अर्थमंत्रालयाचे (महसूल विभाग-अबकरी व कस्टमचे सेंट्रल बोर्ड) पत्र

Refund of IGST paid on export of goods under Rule 96 of CGST Rules 2017
Dated 9th October, 2017 | Copy of | Customs Instruction No.16/2017 |

**F.No.450/119/2017-Cus IV**
**Government of India**
**Ministry of Finance**
**Department of Revenue**
**(Central Board of Excise & Custom) New Delhi**

To
All Principal Chief Commissioners/Chief Commissioners of Customs/Customs (Preventive),
All Principal Chief Commissioners/Chief Commissioners of Customs and Central Excise,
All Directors General,
All Principal Commissioners/Commissioners of Customs/Customs (Preventive),
All Principal Commissioners/Commissioners of Customs and Central Excise.

**Refund of IGST paid on export of goods under Rule 96 of CGST Rules 2017 - regarding**

Your attention is invited to Instruction No.15/2017-Customs dated 09.10.2017 on the aforementioned subject. In this regard a letter has been received from Chief Controller of Account (copy enclosed) wherein they have expressed their inability to initiate the process of disbursement of IGST refund through PFMS portal from 10.10.2017 due to ongoing migration of existing hardware& software infrastructure of PFMS.

2. In the given circumstances, Chief Controller of Account has proposed to use the existing tax refund payment system for refund payment of IGST on exports. In the existing system the concerned departmental officer (Assistant Commissioner/Deputy Commissioner of the Customs Commissionerate) issues a single cheque to the bank along with a list of exporters containing details of their bank accounts, amount of refund etc. Against the single cheque of consolidated amount of refund, the authorized bank credits the bank account of the exporters mentioned in the list through ECS/NEFT/RTGS. The cheque books for this purpose are provided by the field PAOs to the departmental officers.

3. In view of above it is directed to use the existing system to make immediate payment of refund of IGST on Exports w.e.f. 10th October 2017 till 14th October 2017. The payment through PFMS portal would be started from 16th October 2017. The cheque books presently being used for refund payments may also be used for refund of IGST on exports by the Departmental Officers. In case of requirement of additional cheque books by the Customs formations, the same may be provided by the concerned PAO.

4. This issues with the approval of Member (Customs).

Sd/-
**(Maninder Kumar)**
OSD (Cus-IV)

# ‘जीएसटी’चा दिलासा

- दैनंदिन वापरातील १७८ वस्तूंवर आता १८% कर
- ५० वस्तुंवर २८% आकारणी

**गुवाहाटी (आसाम) :** वस्तु आणि सेवा करातील (जीएसटी) आतापर्यंतचे सर्वात मोठे बदल करताना दैनंदिन वापरातील २०० हून अधिक वस्तूंवरील जीएसटी कमी करण्यात आला असून ग्राहक आणि छोट्या व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. जीएसटी कौन्सिलच्या दोन दिवस झालेल्या बैठकीनंतर दैनंदिन वापरातील १७८ वस्तूंवरील जीएसटी २८ वरून १८ टक्क्यांवर आणण्यात आला आहे. याशिवाय १८, १२ आणि ५ टक्क्यांच्या स्लॅबमध्ये मोठे बदल करण्यात आले आहेत. केवळ ५० वस्तुंना २८% जीएसटी दर असेल. नवे दर १५ नोव्हेंबरपासून अंमलात आलेत.

**(अ) ज्या वस्तू जीएसटी परिषदेने २८% पासून १८% पर्यंत कमी करण्याची शिफारस केली आहे त्यात खालील समाविष्ट आहे:**

◆ वायर, केबल्स, इन्सुलेटेड कंडक्टर्स, इलेक्ट्रिकल इन्सुलेटर्स, इलेक्ट्रिकल प्लगस्, स्विच, सॉकेट, फ्यूज, रिले, इलेक्ट्रिकल कनेक्टर्स, ◆ विद्युत नियंत्रण किंवा वितरणासाठी इलेक्ट्रिकल बोर्ड, पॅनल्स, कन्सोल, कॅबिनेट इ. ◆ पार्टीकल / फायबर बोर्ड आणि प्लायवुड, लाकडी वस्तु, लाकडी फ्रेम, पेविंग ब्लॉक ◆ फर्निचर, पलंग, बेडिंग आणि तत्सम फर्निशिंग ◆ ट्रंक, सूटकेस, व्हॅनिटी केसेस, ब्रिफकेस, प्रवासी बॅग आणि इतर हॅण्डबॅग, केसेस ◆ डिटर्जंट्स, वॉशिंग आणि सफाई साहित्य ◆ त्वचा धुण्यासाठी लिक्वीड किंवा क्रिम ◆ शैंपू, हेअर क्रीम, हेअर डायज (नैसर्गिक, हर्बल किंवा कृत्रिम) आणि अशाच इतर वस्तू, हिना पावडर किंवा पेस्ट, कोणत्याही इतर घटकांसह मिश्रित न केलेले. ◆ प्री शेव, शेव किंवा आफ्टर शेव, वैयक्तिक डीओड्रंटस्, स्नान सुगंधी द्रव्ये, कॉस्मेटिक किंवा शौचालय सफाई साहित्य, रूम फ्रेशनर्स ◆ परफ्यूम आणि टॉयलेट वॉटर ◆ सौंदर्य किंवा मेकअपचे साहित्य ◆ पंखे, पंप, कॉम्प्रेसर ◆ दिवे आणि लाईट फिटींग्ज ◆ प्रायमरी सेल आणि प्रायमरी बॅटरी ◆ सेनेटरी वेअर आणि सर्व प्रकारचे भाग ◆ प्लास्टीकच्या वस्तू, फ्लोअर कव्हरींग, न्हाणीघरे, शॉवर, सिंक, वॉशबेसिन, सिटस्, प्लास्टीकचे सॅनेटरी वेअर ◆ मार्बल आणि ग्रेनाईटचे स्लैब्स ◆ मार्बल आणि ग्रेनाईटचे सामान जसे की फरश्या ◆ सर्व प्रकारच्या सिरेमिक फरश्या ◆ विविध वस्तु जसे व्हॅक्यूम फ्लास्क, लाइटर्स ◆ मनगटी घड्याळे, घड्याळे, घड्याळ्याचे पार्टस्, घड्याळ केसेस्, पट्ट्या, ◆ कपड्याच्या वस्तू, गुटस्, कृत्रिम फर आणि इतर वस्तू जसे की जनावरांसाठी खोगीर आणि जुंपली ◆ कटलरी वस्तू, स्टोव्ह, कुकर्स आणि अशाच प्रकारचे नॉन-इलेक्ट्रिक घरगुती उपकरणे ◆ वस्तरा आणि रेजर ब्लेड ◆ मल्टीफंक्शनल प्रिंटर, कार्टरेज ◆ कार्यालयीन किंवा डेस्क साहित्य ◆ दरवाजा, खिडक्या आणि अॅल्युमिनियमच्या फ्रेमस् ◆ प्लास्टीकच्या वस्तू जसे बोर्ड, शिट ◆ सिमेंट किंवा कॉंक्रीटच्या वस्तू किंवा दगड आणि कृत्रिम दगड ◆ डांबर किंवा स्लेटच्या वस्तू ◆ मायका साहित्य ◆ सिरेमिक फ्लोअरिंग ब्लॉक, पाईप, नळ, पाईप फिटिंग ◆ वॉल पेपर आणि वॉल कव्हरिंग ◆ सर्व प्रकारचे ग्लास आणि आरसा, सेफ्टी ग्लास, शीटस्, काचेच्या वस्तू ◆ इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रानिक वजन मशिनरी ◆ अग्निशामक आणि अग्निशामक शुल्क ◆ फोर्क लिफ्टस्, लिफ्टिंग आणि हँडलिंग उपकरणे ◆ बुल्डोजर्स, एक्सावेटर्स, लोडर, रोड रोलर्स ◆ अर्थमुव्हिंग आणि लेवलिंग मशिनरी ◆ एस्केलेटर ◆ कुलिंग टॉवर्स, प्रेशर वेसल्स, रिएक्टरस ◆ शिलाई मशिनचा क्रॅन्कशाफ्ट, शिंप्याची रिंगी, बेरींग हाऊजींग, गिअर आणि गिअरींग बॉल किंवा रोलर, स्क्रू, गास्केट ◆ रेडिओ आणि दूरदर्शन प्रसारणासाठी विद्युत उपकरणे ◆ ध्वनी रेकॉर्डिंग किंवा पुनरूत्पादन यंत्र ◆ वाहुतकीसाठी सुरक्षितता किंवा रहदारी सिग्नलिंग उपकरणे ◆ शारिरीक व्यायाम उपकरणे, उत्सव आणि कार्निव्हलचे उपकरणे, झोके, शूटिंग रेंज, चक्कर, व्यायामशाळा आणि अॅथलेटिक उपकरणे ◆ सर्व संगीत वाद्य आणि त्यांचे भाग ◆ कृत्रिम फुलं, झाडाची पाने आणि कृत्रिम फळे ◆ विस्फोटक, अॅन्टीकॉकींग प्रिपरेशन, फटाके ◆ कोक, बटर, फॅट, ऑइल पावडर ◆ अर्क, इसेन्स आणि कॉन्सट्रेटस् ऑफ कॉफ़ी, विविध अन्न तयारी ◆ चॉकलेट, च्यूइंगम / बबल गम ◆ माल्ट अर्क आणि अन्नपदार्थाचे पिठ, धान्ये, ग्रुट, जेवण, स्टार्च किंवा माल्ट अर्क ◆ वॅफल्स आणि चॉकलेट किंवा कोटेड वेफर्स ◆ रबरी नलिका आणि रबरच्या विविध वस्तू ◆ चष्मे, दुर्बिण, टेलिस्कोप ◆सिनेमॅटोग्राफिक कॅमेरे आणि प्रोजेक्टर, इमेज प्रोजेक्टर ◆ मायक्रोस्कोप, निर्दिष्ट प्रयोगशाळा उपकरणे, विशिष्ट वैज्ञानिक उपकरणे जसे की हवामानशास्त्र, जल विज्ञान, समुद्रसंपत्ती, भूविज्ञान ◆ सॉलवंट, थिनर्स, हायड्रॉलिक द्रव, अॅन्टीफ्रिझिंग प्रिप्रेशन




**(ब) ज्या वस्तूंना परिषदेने जीएसटी दरात २८% ते १२% पर्यंत कपात करण्याची शिफारस केली आहे :**

◆ ओले ग्राइन्डर्स ज्यामध्ये दगडी ग्राइंडरचा समावेश आहे ◆ टाक्या आणि इतर चिलखताचे लढाऊ वाहन

**(II) वस्तूंच्या जीएसटीवरील इतर बदल / सुधारणा :**

**(अ) १८% ते १२%**

◆ कन्डेन्स्ड दूध ◆ रिफाइन्ड साखर आणि साखरेचे क्युब ◆ पास्ता ◆ करी पेस्ट, मायोनिंज आणि सॅलड, मिश्र मसाले आणि मिश्रित मसाला

(उर्वरीत पान १२ वर)

# ‘जीएसटी’चा त्रास, मात्र मंदी नाही - मंडलेचा

विकासदर वाढीसाठी कृषी उद्योग केंद्रस्थानी हवेत

**सांगली :** केंद्र सरकारने वस्तू व सेवा कर (जीएसटी) लागू केल्याने व्यापाऱ्यांना त्रास होतोय हे खरे आहे, मात्र त्यामुळे उद्योग, व्यवसायावर मंदी आलेली नाही. हा कर स्थिर व्हायला वेळ लागेल. त्यानंतर त्याचे फायदे समोर येतील, असा विश्वास महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संतोष मंडलेचा यांनी सांगली चेंबर ऑफ कॉमर्समध्ये पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

महाराष्ट्र चेंबर ९० वर्षे पूर्ण करून शतकमहोत्सवी दशकात पाऊल ठेवताना नवी दिशा आणि वेग घेऊन पुढे जात आहोत, असे त्यांनी सांगितले. देशाचा विकासदर वाढवण्यासाठी कृषी प्रक्रिया उद्योगाला केंद्रस्थानी ठेवावे लागेल. त्यासाठी कृषी क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योगांना नव्या संधी शोधण्यावर भर दिला जाणार आहे. त्यासाठी एप्रिल २०१८ मध्ये ‘महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्स्पो’ घेतला जाणार आहे असे त्यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले, नोटबंदी, जीएसटीमुळे देशाचा विकासदर खाली आला आहे मात्र हा कर लागू करताना जगाचे लक्ष आपल्याकडे आहे. चार टप्पे असलेली कररचना भविष्यात बदलून दोन टप्प्यांचीच व्हावी, अशी आमची अपेक्षा आहे. या करातील त्रुटींविषयी सरकारशी सतत संवाद सुरू आहे. त्यात आवश्यक बदल केले जात आहेत. त्यामुळे त्रास कमी व्हायला मदत होतेय. मंदी मात्र नाही. कुठल्याच क्षेत्रातील उलाढाल कमी झालेली नाही. गेल्या २५ वर्षांत कृषी क्षेत्राचा विकासदर १५.५ ते १५.७ टक्क्यांवर अडकला आहे, तो वाढला तरच देशाचा विकासदर वाढले. आम्ही नेदरलँड सरकारसोबतही चर्चा करतोय. दूधावर प्रक्रिया उद्योगात संधी दिसताहेत. सांगली, कोल्हापूरमध्ये त्या शोधल्या जातील.




**सांगली येथे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष संतोष मंडलेचा यांचा सत्कार करताना सांगली चेंबरचे अध्यक्ष शरद शहा, सोबत महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष ललित गांधी, संचालक अरुण दांडेकर, संदीप भंडारी, स्वप्नील शहा व अन्य**

महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष ललित गांधी, संचालक अरुण दांडेकर, संदीप भंडारी, स्वप्नील शहा, सांगली चेंबरचे अध्यक्ष शरद शहा आदी उपस्थित होते.

# विमानसेवा १५ डिसेंबरपर्यंत सुरू न झाल्यास आंदोलन

## ‘गोशिमा’ कार्यालयातील बैठकीत उद्योजकांचा इशारा

**उजळाईवाडी (कोल्हापूर) :** गेली चार वर्षे बंद असलेली विमानसेवा १५ डिसेंबरपर्यंत सुरू न झाल्यास कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सच्या नेतृत्वाखाली १६ डिसेंबरला विमानतळावर एक दिवसांचे लाक्षणिक उपोषण करण्याचा निर्णय गोकुळ शिरगाव येथील गोशिमाच्या कार्यालयात चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील गोकुळ शिरगाव मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन, मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ कागल अँड हातकणंगले यांच्या संयुक्त बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला.

कोल्हापूरचा औद्योगिक विकास छत्रपती राजाराम महाराज यांच्यानंतर खऱ्या अर्थाने येथील उद्योजकांच्या स्वकर्तृत्वावर उभारला आहे. हा उद्योग वाढीसाठी दळणवळणाचे मोठे साधन म्हणून व वेळेची बचत म्हणून विमानसेवा सुरू होणे गरजेचे आहे, पण गेली ४ वर्ष कोल्हापूरची विमानसेवा बंद असल्याने मोठे उद्योग येणे बंद झाले आहे.




**गोशिमा कार्यालयामध्ये आयोजित बैठकीमध्ये कोल्हापूर चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष चंद्रकांत जाधव, संजय शेटे यांचे स्वागत करताना सुरजितसिंग पवार सोबत राजू पाटील, हरीषचंद्र धोत्रे, योगेश कुलकर्णी, बाबासो कोंडेकर आदी.**

बैठकीसाठी चेंबर ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष संजय शेट्टी, उपाध्यक्ष चंद्रकांत जाधव, गोशिमाचे अध्यक्ष सुरजितसिंग पवार, स्मॅकचे अध्यक्ष राजू पाटील, मॅकचे अध्यक्ष हरीषचंद्र धोत्रे, सी. आय. आय. चे अध्यक्ष योगेश कुलकर्णी, कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनचे अध्यक्ष बाबासो कोंडेकर तसेच सर्व औद्योगिक संस्थेचे पदाधिकारी, संचालक व उद्योजक उपस्थित होते.

# कोल्हापूरच्या उद्योजकांना प्लास्टिक उद्योगात नवीन संधी




**उद्योजकांच्या मेळाव्यामध्ये मार्गदर्शन करताना चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, सोबत खासदार धनंजय महाडिक, चंद्रकांत तुरखिया, योगेश कुलकर्णी, सुरजितसिंग पवार.**

**कोल्हापूर :** भविष्यात उद्योग क्षेत्रात प्लास्टिक उद्योगचा मोठा वाटा असणार आहे. कोल्हापूरच्या उद्योजकांनी फौंड्री आणि मशीन शॉपच्या पलीकडे जाऊन प्लास्टीक उद्योगामध्ये नवीन संधी हस्तगत करण्याची गरज आहे असे प्रतिपादन खासदार धनंजय महाडीक यांनी केले.

अहमदाबाद (गुजरात) येथे 'प्लास्ट इंडिया प्रदर्शन' होत आहे. या पार्श्वभूमीवर कोल्हापूरात आयोजित उद्योजकांच्या मेळाव्यात ते बोलत होते.

प्लास्टीक उद्योगातील सर्वात मोठे 'प्लास्ट इंडिया २०१८' हे सर्वात मोठे प्रदर्शन ७ ते १० फेब्रुवारी दरम्यान होणार आहे, अशी माहिती प्लास्ट इंडिया फाऊंडेशनचे राजीव चिंतलीया यांनी पत्रकारांना दिली. यावेळी खासदार धनंजय महाडीक, प्रदर्शनाचे प्रमुख चंद्रकांत तुरखिया, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रिजचे अध्यक्ष ललित गांधी, सीआयआयचे योगेश कुलकर्णी, गोशिमाचे अध्यक्ष सुरजितसिंग पवार, बाबा कोंडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

संयोजक सत्यजीत भोसले म्हणाले, हे प्रदर्शन १,२५,००० चौरस मीटर जागेत भरणार असून, ४० देशातील प्लास्टीक उद्योजकांसह, २००० स्टॉलधारक सहभागी होणार आहेत. स्टार्ट अपसाठी प्लास्टीक उद्योगाची नविन बाजारपेठ उभा करण्यासाठीची माहिती उपलब्ध केली जाणार आहे. बैठकीस मुकेश शहा, नितीन कोंडाळकर, किसन कलाणी, उदय घाटगे आदी उपस्थित होते. ◆◆




**इनव्हेस्ट इन कोल्हापूर या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी, सोबत सुरजितसिंह पवार, आनंद माने, मोहन घाटगे, योगेश कुलकर्णी, संजय जोशी आदी मान्यवर.**

# 'सीआयआय'तर्फे 'इनव्हेस्ट इन कोल्हापूर'चे आयोजन

## प्रदर्शनाच्या माहिती पत्रिकेचे प्रकाशन

**कोल्हापूर :** 'मेक इन इंडिया'च्या धर्तीवर कोल्हापुरात नोव्हेंबरमध्ये 'इनव्हेस्ट इन कोल्हापूर' हे प्रदर्शन कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीतर्फे (सीआयआय) भरविण्यात येणार आहे. या प्रदर्शनाच्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

येथील रेसिडेन्सी क्लबमध्ये माहितीपुस्तिका प्रकाशनाचा कार्यक्रम झाला. यावेळी प्रदर्शनाबाबत चर्चा केली. त्यात 'सीआयआय'चे अध्यक्ष योगेश कुलकर्णी म्हणाले, प्रदर्शनात देश-विदेशांतील विविध कॉर्पोरेट कंपन्यांचे स्टॉल्स्, त्यांची यंत्रसामग्री, उद्योग क्षेत्राशी संबंधित सर्वच उत्पादनांचे स्टॉल्स् असणार आहेत. प्रदर्शनात चर्चासत्र, बिझनेस वर्कशॉप, मुलाखती, तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे.

प्रदर्शनाच्या माध्यमातून गुंतवणूक कोल्हापूरमध्ये आणत असताना कोल्हापूरनेही याचा विचार करणे आवश्यक असल्याचे कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी यावेळी सांगितले. ते म्हणाले, कोल्हापूरची प्रतिमा बदलत असून, येथील ब्रँड नावारूपाला आणणे आवश्यक आहे.

कार्यक्रमास 'सीआयआय'चे सचिन शिरगांवकर, उद्योजक चंद्रकांत जाधव, सुरजितसिंह पवार, संजय जोशी, चंद्रकांत मुळे, बाबासो कोंडेकर, दिपंकर विश्वास, राजू पाटील, क्रिएटिव्हजचे सुजित चव्हाण, मोहन घाटगे, आनंद माने, सुरेंद्र जैन आदी उपस्थित होते. ताज मुल्लाणी यांनी सुत्रसंचालन केले. सीआयआयचे उपाध्यक्ष प्रताप पुराणिक यांनी आभार मानले.

दरम्यान या प्रदर्शनास कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रिज, गोशिमा, स्मॅक, फौंड्रीमन असोसिएशन, मॅक, स्लिमा, कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन, उद्यम सोसायटी, एमएसएमई आदी संस्था सहकार्य करतील. क्रिएटिव्हज एक्झिबिशन ॲन्ड इव्हेंट या संस्थेकडे प्रदर्शनाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. ◆◆

## 'विकास विद्या मंदिर' च्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी संगणक प्रशिक्षण उपयुक्त ठरेल - ललित गांधी

### 'महावीर एज्युकेशन' च्या रौप्यमहोत्सवानिमित्त ५ संगणक प्रदान



**महावीर एज्युकेशन सोसायटी तर्फे अतुल दिघे यांना संगणक प्रदान करताना ललित गांधी, धनश्री व्हनागडे व नीलम जाधव सोबत विजय कुंभार, विश्वजीत जाधव, आर.वाय.पाटील, पी.आय.नायकवडी आदी.**

**कोल्हापूर** : विकास विद्यामंदिर मध्ये उभारलेली सुसज्ज संगणक प्रयोगशाळा विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरेल असे प्रतिपादन महावीर एज्युकेशन सोसायटी चे अध्यक्ष व विकास विद्या मंदिर चे माजी विद्यार्थी ललित गांधी यांनी व्यक्त केले.

महावीर एज्युकेशन सोसायटीच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त ललित गांधी फाऊंडेशन च्या वतीने 'विकास विद्या मंदिर' च्या संगणक कक्षासाठी ५ संगणक संच प्रदान करण्यात आले. त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते आपले मनोगत व्यक्त करीत होते.

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष कॉम्रेड अतुल दिघे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या समारंभास संस्थेचे पदाधिकारी आर.वाय.पाटील, आर.बी.पाटील, विजय कुंभार, अनिल पाटील, पी.आय. नायकवडी, आदर्श प्रशालेच्या प्रमुख लता कुलकर्णी, आर. पी.शिंदे, मुख्याध्यापिका के.जी. आवळे, महावीर च्या मुख्याध्यापिका धनश्री व्हनागडे, ब्लॉसम च्या मुख्याध्यापिका नीलम जाधव यांच्या उपस्थित संपन्न झालेल्या समारंभाप्रसंगी ललित गांधी पुढे म्हणाले की, मी स्थापन केलेली शाळा रौप्यमहोत्सव साजरा करीत असताना, मी ज्या शाळेत शिकलो तेथील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा ही पूर्ण व्हाव्यात या हेतुने शाळेच्या उपकारातुन उतराई व्हावे या भावनेने आज ५ संगणक संच प्रदान करताना या शाळेत शिकणाऱ्या सामान्य कुटूंबातील विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची सोय उपलब्ध होणार आहे याचे समाधान असल्याची भावना व्यक्त केली. तसेच या उपक्रमासाठी सहकार्य केल्याबद्दल किशोर तावडे यांना धन्यवाद दिले.

संस्थेचे अध्यक्ष अतुल दिघे यांनी या महत्वपूर्ण योगदानाबद्दल महावीर एज्युकेशन सोसायटीप्रती आभार व्यक्त केले, तसेच माजी विद्यार्थी ललित गांधी यांनी आपल्या बालपणीच्या शाळेचे आवर्जुन स्मरण ठेवले ही बाब उल्लेखनीय असल्याचे सांगितले. याप्रसंगी संस्थेचे सेक्रेटरी आर.वाय.पाटील, आर.पी.शिंदे यांनीही मनोगत व्यक्त केले. खजानीस पी.आय. नायकवडी यांनी आभारप्रदर्शन केले.



**शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमाची प्रमाणपत्रे वितरण करताना डॉ. प्रशांत अमृतकर, ललित गांधी, सौ. निलम जाधव, सौ. धनश्री व्हनागडे व अन्य.**

## 'महावीर एज्युकेशन सोसायटी' चा 'शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम' करीअरसाठी उपयुक्त - डॉ. प्रशांत अमृतकर

### १२ व्या बॅचचा पदविका प्रमाणपत्र वितरण समारंभ संपन्न

**कोल्हापूर** : 'महावीर एज्युकेशन सोसायटी' व 'ललित गांधी फाऊंडेशन' तर्फे चालविण्यात येणारा 'शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम' तरूणींकरीता शिक्षण क्षेत्रात करीअरसाठी अत्यंत उपयुक्त व महत्वपूर्ण अभ्यासक्रम असल्याचे प्रतिपादन शहर पोलीस उपअधिक्षक डॉ. प्रशांत अमृतकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या १२ व्या बॅचच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण समारंभप्रसंगी मुख्य पाहुणे म्हणून ते बोलत होते. ललित गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या समारंभास मुख्याध्यापिका सौ. धनश्री व्हनागडे व मुख्याध्यापिका सौ. निलम जाधव यांची विशेष उपस्थिति होती.

डॉ. अमृतकर पुढे म्हणाले की, वैद्यकीय शिक्षण घेऊनसुध्दा अधिकारी होण्याची तीव्र ओढ असल्याने स्पर्धा परिक्षेला बसलो, नकारात्मक विचार टाळून, सकारात्मक विचाराने कठोर परिश्रम करून पहिल्याच वर्षात राज्यात १० व्या क्रमांकाने उत्तीर्ण होऊ शकलो, यामागे शिक्षक व आई वडीलांचे संस्कार उपयोगी पडले. शिक्षकी पेशा हा विद्यार्थ्यांचे जीवन घडविणारा आहे म्हणूनच या अभ्यासक्रमाचे विशेष महत्व आहे.

अध्यक्ष ललित गांधी यांनी संस्थेने सलग १२ वर्षे शंभर टक्के निकालाची व शंभर टक्के नोकरीची परंपरा जपल्याबद्दल सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले. तसेच आज अखेर उत्तीर्ण झालेले सर्व ३८० विद्यार्थी शिक्षक अथवा स्वतःच्या शाळेचे संस्थाचालक म्हणून सेवा बजावतात ही अभिमानास्पद गोष्ट असल्याचे सांगितले.

ब्लॉसम प्ले स्कूल च्या मुख्याध्यापिका सौ. निलम जाधव यांनी अभ्यासक्रमाची माहीती दिली. विशेष प्रशिक्षक सौ. शिल्पा हुजरबाजार, सौ. मृणाल डावजेकर, दयानंद माळी यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.

उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. प्रशांत अमृतकर व ललित गांधी यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात आली.

सौ. अरूणा टिपुगडे यांनी सुत्रसंचालन केले, तर सौ. स्मिता गायकवाड यांनी आभार प्रदर्शन केले.

# ललित गांधी यांनी कोल्हापूरचे नाव जागतिक स्तरापर्यंत गौरवान्वित केले - खा. धनंजय महाडीक

## ललित गांधी यांचा ५० वा वाढदिवस विविध उपक्रमांनी संपन्न



समारंभात दीपप्रज्वलन करताना महापौर हसिना फरास, सोबत ललित गांधी, वसंत भोसले, मकरंद देशमुख, संदीप भंडारी, जयेश ओसवाल, भरत गांधी, प्रविण शहा, राजु शहा, जया गांधी, धनश्री व्हनागडे, निलम जाधव व शर्मिला मोहिते.



ललित गांधी यांचा ५० व्या वाढदिवसानिमित्त सत्कार करताना खासदार धनंजय महाडीक, आमदार सुजित मिणचेकर, भरत गांधी, जया गांधी, प्रवीण शहा, जयेश ओसवाल, रणजित पारेख इ. मान्यवर.

**कोल्हापूर :** कोल्हापूरच्या मातीत जन्माला येऊन ललित गांधी यांनी शहराचे नाव देशासह जागतिक स्तरापर्यंत गौरवान्वित केले ही बाब आम्हा सर्वांसाठी भुषणावह आहे असे प्रतिपादन खासदार धनंजय महाडीक यांनी केले.

ललित गांधी यांच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्ष म्हणुन ते बोलत होते.

याप्रसंगी महापौर हसिना फरास, जि. प. अध्यक्षा शौमिका महाडीक, आमदार सुजित मिणचेकर, आमदार प्रकाश आबिटकर, आमदार चंद्रदिप नरके, सौ. शर्मिला मोहिते, नगरसेवक ईश्वर परमार, सत्यजित कदम, विजय खाडे, मनिषा बारामते, महेश सावंत यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

ललित गांधी यांनी प्रास्ताविकात आपल्या सार्वजनिक जीवनातील वाटचालीचा आढावा घेतला व समाजाची सेवा हीच आपल्या जीवनाची सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे सांगितले.

महापौर हसिना फरास यांनी दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ केला व कोल्हापूर शहराच्या वतीने ललित गांधी यांचा सत्कार केला.

जि. प. अध्यक्षा शौमिका महाडीक यांनी ललित गांधी यांच्या शैक्षणिक कार्याचे कौतुक करताना महावीर एज्युकेशन सोसायटीचे कार्य जिल्ह्यासाठी आदर्शवत असल्याचे सांगुन ललित गांधी यांनी जि. प. शाळांच्या विकासातही योगदान देण्याचे आवाहन केले.

आमदार प्रकाश आबिटकर यांनी सहकार क्षेत्रातील ललित गांधी यांच्या कार्याचा आढावा घेतला व त्यांच्या योगदानामुळे पतसंस्था चळवळीला बळकटी मिळाल्याचे सांगितले.

खासदार महाडीक पुढे म्हणाले की, ललित गांधी यांनी आरोग्य सेवा, दिव्यांग, कॅन्सर क्षेत्र, आपत्तिमधील सेवा यासारख्या कामातुन समाजाशी भावनिक नाते जोडले आहे. स्थानिक स्तरापासुन आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंतच्या शिखर संस्थापर्यंत आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर मजल मारणारे शहरातील एकमेव व्यक्तिमत्व आहे.

याप्रसंगी गुजरी मंदिरचे उपाध्यक्ष राजेश ओसवाल, क्रिडाई इचलकरंजी चे अध्यक्ष नितिन धुत, भरत गांधी, लक्ष्मीपुरी मंदिर चे अध्यक्ष कांतीलाल गुलाबचंदजी, भक्तीपुजाचे उपाध्यक्ष हिराचंद वरदीचंदजी, शत्रुंजय मंदिरचे अध्यक्ष अमृतभाई शहा, सराफ संघाचे अध्यक्ष भरत ओसवाल, प्रदिपभाई कापडीया, आनंद माने, महावीर गाठ, जयेश ओसवाल, जैन फेडरेशनचे महामंत्री संदिप भंडारी, जिनेंद्र कावेडीया, राजारामपुरी असो. चे माणिक पाटील, रणजित पारेख, रमेश कारवेकर, अनिल पिंजाणी, स्नेहल मगदुम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

जया गांधी यांनी गांधी परिवारातर्फे शुभेच्छा व्यक्त केल्या. मुख्याध्यापिका निलम जाधव व धनश्री व्हनागडे यांनी प्रास्ताविक केले. विद्या सरमळकर व तृप्ती साजणे यांनी सुत्रसंचालन केले.

# नव्या इको स्पोर्टस कारचे ललित गांधी यांच्या हस्ते अनावरण







**कोल्हापूर :** येथील युनिक फोर्ड शोरूमतर्फे हॉटेल सयाजी येथे नवीन फोर्ड इको स्पोर्टस् या एसयुव्हीचे अनावरण झाले. कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष ललित गांधी आणि फोर्ड इंडिया लि. चे उपाध्यक्ष लक्ष्मी रामकुमार यांच्या हस्ते फोर्ड इको स्पोर्टस्चे अनावरण झाले.

कार्यक्रमला फोर्ड इंडिया लि.चे डिव्हिजनल रिजनल मॅनेजर नीरज गुप्ता, रिजनल सेल्स मॅनेजर आदित्य सक्सेना, युनिक ग्रुप ऑफ डीलर्सचे चेअरमन कांतीलाल चोरिडया, डायरेक्टर राहुल चोरडिया, विशाल चोरिडया, रौनक चोरिडया उपस्थित होते. युनिक ग्रुपचे जनरल मॅनेजर राजेंद्र दुकाने, ग्रुप हेड किशोर दाणेकर, वैभव नाईक, सुधर्म वाझे यांनी सर्वांचे स्वागत केले.

यावेळी स्मॅकचे अध्यक्ष राजू पाटील, उद्योजक अमर टोपकर–पाटील, अरविंद मेढे, श्रेयस घाटे, पार्शद वायचळ आदी उपस्थित होते.

◆◆

## 'जीएसटी'चा दिलासा

**(पान ७ वरून)** ◆ मधुमेह आहार ◆ औषधी ग्रेड ऑक्सिजन ◆ मुद्रण शाई ◆ हॅण्ड बॅग्ज् आणि ज्युट आणि कॉटनच्या शॉपिंग बॅग्ज् ◆ हॅट्स (बुटाले किंवा शिरे असलेले) ◆ कृषि, बागायती, वनीकरण, कापणी किंवा खळगे मशीनरीचे ठरावीक भाग ◆ शिवणकामाचे विशिष्ट भाग ◆ चष्मा फ्रेम ◆ पूर्णतः बांबू किंवा केन पासून तयार केलेले फर्निचर

**(ब) १८% ते ५%**

◆ पफ्ड राईस चिक्की, शेंगदाणा चिक्की, तिळ चिक्की, रेवडी, तिळ रेवडी, खाजा, काजू अळी, शेंगदाणा लाडू, कुलीया ◆ युनिट कंटेनरमध्ये एक ब्रँड नाव असणाऱ्या बटाट्याचे पीठ ◆ चटणी पावडर ◆ फ्लाय ॲश ◆ कच्च्या तेलाच्या शुद्धीकरण प्रक्रियेत सापडलेले गंधक ◆ फ्लाय ॲश ९०% वा अधिक फ्लाय ॲश सामग्रीसह

**(क) १२% ते ५%**

◆ सुकलेला नारळ ◆ कॉटन धागाने विणलेले कापड (न वापरलेले अप्रोद्योग टॅक्स क्रेडिटच्या परताव्यासह) ◆ इडली, डोसा पीठ ◆ कॉयर कॉर्डेज आणि रोप, जुट सुतळी, कॉयर उत्पादने ◆ कपडे ◆ फ्लॉय ॲश विटा

**(ड) ५% पर्यंत शुन्य**

◆ गवार भोजन ◆ हॉप कोन (ग्राऊंडेड किंवा चूर्ण केलेले किंवा पॅलेट स्वरूपापेक्षा अन्य) ◆ काही सुक्या भाज्या जसे रताळे, मानीयॉक ◆ अनर्क्वड नारळ कवटी ◆ खांडसारी साखर

**(इ) विविध**

◆ विमान इंजिनाकरीता जीएसटी दर २८%, १८% ते ५%, विमानाचे टायर, सिटस्करिता २८% ते ५%◆ लाख व काचेच्या बांगड्यांसाठी जीएसटी दर ३% ते ०%

◆◆


▸ प्रेषक : **ललित गांधी** (अध्यक्ष)

**वेस्टर्न महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज, ॲग्रो अ‍ॅन्ड एज्युकेशन (वेसमॅक)**
'बिझनेस हाउस', १६७७, ई मेन रोड,
राजारामपूरी १० वी गल्ली,
कोल्हापूर – ४१६००८ (महाराष्ट्र)


प्रति,


POSTAL : REGN. No. KLR-302/2015-2017 NAME OF POST OFFICE : RMS, KOLHAPUR
Licensed to Post without Pre-Payment of Postage : WPP License No.: GR/KLP/101/2017

Printed, Published & Edited by Lalit Gandhi (President of WESMACH) Printed at Sakal Papers Ltd, D4, MIDC, Shiroli, Kolhapur - 416 122 and published from Business House, 1677, E, Main Road, Rajarampuri, 10th Line, Kolhapur- 416008. ● Ph.: 0231-2525251, Fax: 0231-2522201 ● Printer /Publisher/ Editor : Lalit Gandhi ● Email : westernchamber@gmail.com

● R.N.I. REGN. No. MAHMAR/2009/36262 ● PUBLICATION DATE : 8 - 9 ● POSTING DATE : 10TH OF EVERY MONTH